# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थ प्रशासन विभाग

---

जाक्रं/अप्रवि/अंसेनियो/ 1018 /२०२२ दिनांक: 02/08/२०२२

**अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादा/प्रथम प्राधान्य**

## परिपत्रक

या परिपत्रक व्दारे नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात येते राज्य शासनातील अधिकारी/कर्मचारी यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. तसेच राज्यातील चारही कृषि विद्यापीठामध्ये या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमध्ये समाविष्ट अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनामधून कपात करण्यात आलेल्या अंशदानाची गहाळ/प्रलंबित/खात्यामधील कमी रक्कमेची/जास्त रक्कमेची नोंदी अद्ययावत करण्यातबाबतचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

**सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना शेवटची सुचना देण्यात येते की, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना विद्यापीठास लागू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. विद्यापीठाअंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू झाल्यानंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना संपुष्टात येईल. सभासदांचे व्याजासह अंशदान शासनाकडून राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरू होण्यापुर्वी आपल्या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत डि.सी.पी.एस. मधील अधिकारी/कर्मचारी यांचे वार्षिक विवरणपत्रातील त्रुटींची पुर्तता करणे गरजेचे आहे. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या विवरणपत्रात काही त्रुटी असल्यास वेळीच दुरूस्ती करणे अपेक्षित होते. तथापि बऱ्याच कार्यालयांकडून सभासदांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये दुरूस्ती करून अद्ययावत केलेल्या नाहीत. त्रुटीच्या दुरूस्तीसाठी विवरणपत्राची मागणी केल्यास कर्मचाऱ्यांना कार्यालयाकडून सांक्षाकित प्रत उपलब्ध करून दिली जात नसून या विभागाकडे पाठविण्यात येते.**

**या अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील सभासदांचे नियुक्तीपासूनचे अथवा स्थानांतरणाने आलेल्या सभासदांच्या वार्षिक विवरणपत्रांची (कार्यालयातील मुळ कागदपत्रांवरून) तपासणी करावी व आय.यु.एम.एस. (I.U.M.S.) सॉफ्टवेअरमधील D.C.P.S. Module मध्ये भरण्यात यावे . तसेच सभासदांच्या अंशदानामध्ये तफावत असल्यास अथवा अंशदान कमी वा जास्त असल्यास संबंधित कार्यालयाने वार्षिक विवरणपत्रातील त्रुटींची पुर्तता करावी.**

तसेच सदर परिपत्रक आपले अधिनस्त नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे. संबंधित वार्षिक विवरणपत्रातील दुरूस्तीची जबाबदारी ही आहरण व संवितरण अधिकारी यांची असल्याने सदर कामास प्राधान्य द्यावे. कारण संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा शासनाच्या आदेशान्वये राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत समावेश होणार असून तद्नंतर अंशदानामध्ये कुठल्याही प्रकारची दुरूस्ती होणार नाही. करीता संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या वार्षिक विवरणपत्रांमधील अंशदान कमी–जास्त किंवा गहाळ असल्यास संबंधितांच्या व्याजावर त्याचा विपरीत परिणाम होईल. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची असून काळजीपुर्वक सदर अंशदानाची योग्य शहानिशा करण्यात यावी

व आय.यु.एम.एस. (I.U.M.S.) सॉफ्टवेअरमधील D.C.P.S. Module मध्ये **दिनांक ३० ऑगष्ट २०२२** पर्यंत भरण्यात यावे अन्यथा संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात येईल व मासीक देयके थांबविण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलीपी:—

१. मा. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरिता सादर.
२. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व).
३. मा. कुलगुरूंचे स्विय सहायक, मा. कुलगुरू डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरिता सादर.
४. वेतन व लेखाधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर यांना माहितीकरीता.
५. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.